पोलीस अधीक्षक कार्यालय
लातूर आयोजित



॥ लोकशक्ती ॥

लोकशक्ती रील्स स्पर्धा-2026

लोकशक्ती रील्स : तुमची रील, आपला बदल - व्यसनमुक्त समाज, सशक्त महिला

विषय : 1) महिला सक्षमीकरण व सुरक्षितता २) सायबर क्राईम जागृती
३) वाहतूक व्यवस्थापन व अपघात प्रतिबंध ४) Say No To Drugs

भव्य बक्षिसे

- **21,000** प्रथम क्रमांक
- **11,000** व्दितीय क्रमांक
- **7,000** तृतीय क्रमांक

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (गिफ्ट, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र)
सर्वोत्कृष्ट अभिनेता (गिफ्ट, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र)
सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (गिफ्ट, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र)
तसेच सर्व अंतिम निवडलेल्या विषयनिहाय रिल्स टीमला प्रत्येकी एक प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येईल.

आपली रील्स
spofficelatur@gmail.com

आपल्या रील्सची प्रवेशिका
सर्व कंटेस्टंट आपला कंटेन्ट गूगल ड्राईव्ह वर अपलोड करून त्याची लिंक वरील ई-मेल आयडीवर सेंड करावी.

#latur Rural Police
#StopAddiction
#AntiDrugs Campaign
#Nari Shakti
#WomenPower

रिल्स ची निवड चाचणी हि तज्ज्ञ परीक्षकांकडुन घेण्यात येईल व त्यातील निवडक रील्स ह्या अंतिम फेरी साठी निवडल्या जातिल.

अंतिम निवड केलेल्या 20 रील्सचे स्क्रीनिंग

पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

समन्वयक / संपर्क

PI Babita Wakadkar, PS Cyber Latur, Mob No 9552558507
API Sachin Chavan, Welfare, Latur, Mob No 9011334580
API Vaibhav Netke, PRO, Latur, Mob No 9370986813
HC Sagar Alapure, Ps Cyber Latur, Mob No 9595859889

तुमची रील, आपला बदल

पोलीस अधीक्षक कार्यालय
लातूर आयोजित

" लोकशक्ती रील्स स्पर्धा-2026 "

महाराष्ट्रातील सर्व नागरिकांसाठी एक सुवर्णसंधी !
लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने समाजजागृतीसाठी रील्स स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

: स्पर्धेची नियमावली :

१) रील्सचा विषय हा नमुद चार विषयांशी संबंधीत असावा.
२) लोकशक्ती रील्स स्पर्धेचा प्रवेश हा विनामूल्य असेल.
३) लोकशक्ती रील्स स्पर्धा ही महाराष्ट्रातील सर्वांसाठी खुली करण्यात आली आहे.
४) रील्स मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यापैकी कुठल्याही एका भाषेत असणे आवश्यक आहे.
५) रील्स मध्ये अश्लीलता किंवा बिभत्स्य कृत्य, क्रूरता, किळसवाणे प्रसंग असणार नाहीत याची दक्षता कटाक्षाने घ्यावी. रील्स मध्ये दाखविलेले प्रसंग हे सेंन्सॉरच्या अधिनियमा नुसार असणे आवश्यक आहे.
६) रील्स सादरीकरणाची एकुण वेळ ही ३० ते १८० सेकंदा (३ मिनिट) पर्यंत असावी.
७) रजिस्ट्रेशनसाठी लातूर पोलीस वेबसाईटवर एक टॅब/लिंक देण्यात आलेली आहे.
८) आपण तयार केलेली रील तुमचा स्वतःचा गूगल ड्राइव्हवर सेव करून त्याची लिंक **spofficelatur@gmail.com** या ईमेलवर पाठविण्यात यावी.
९) रील्स मध्ये वापरलेली सामग्री ही स्वतः च्या मालकीची किंवा परवानाधारक असणे आवश्यक आहे.
१०) रील्स मध्ये कोणतेही कॉपीराईट केलेले लोकेशन, प्रसंग, संगीत साहित्य वापरलेले नसावे. तसेच रील्स ही कॉपीराईट केलेली नसावी.
११) रील्स ही स्पर्धे साठी नविन असणे आवश्यक आहे. तसेच रील्स ही सोशल मिडीयावर टाकलेली नसावी.
१२) रील्स ची निवड चाचणी हि तज्ज्ञ परीक्षकांकडुन घेण्यात येईल व त्यातील निवडक रील्स ह्या अंतिम फेरी साठी निवडल्या जातिल. त्यांना अंतिम स्पर्धेच्या दिवशी आमंत्रित करण्यात येईल व त्याच दिवशी बक्षिस वितरणाचा कार्यक्रम होईल.
१३) स्पर्धकांनी रील्सची संपुर्ण माहिती ही आयोजकांना स्वनिर्मिती असणे बाबत लेखी देणे बंधनकारक असेल.
१४) परिक्षकांनी निवडलेल्या रील्सचा निकाल हा अंतिम व बंधनकारक राहिल.
१५) लोकशक्ती रील्स स्पर्धेतील विषय निहाय पारितोषिक पुढील प्रमाणे आहेत.
प्रथम सर्वोत्कृष्ट रील पारितोषिक (२१०००/-), व्दितीय सर्वोत्कृष्ट रील पारितोषिक (११०००/-), तृतिय सर्वोत्कृष्ट रील पारितोषिक (७०००/-), या प्रमाणे तसेच सर्व अंतिम निवडलेल्या विषयनिहाय रील टीमला प्रत्येकी एक प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येईल.
१६) अंतिम स्पर्धेत सादरीकरण (स्क्रीनिंग) साठी निवडलेल्या रील्सचे संपुर्ण हक्क हे पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर पोलीसांचे राहतील.
१७) लोकशक्ती रील्स स्पर्धेमध्ये रील्सचे प्रसारण हे समाज हिताच्या दृष्टीने सोशलमिडीयावर प्रक्षेपणाचा संपुर्ण हक्क सर्वप्रथम लातूर जिल्हा पोलीस दलाचा असेल. तसेच स्पर्धा संपल्या नंतर समन्वय समितीच्या आदेशाने आपल्या रील्स सोशलमिडीयावर प्रसारीत करण्याचा हक्क आपल्याला दिला जाईल. या साठी आमची परवानगी घेणे आवश्यक व बंधनकारक असेल.
१८) अंतिम निवडलेल्या संघांना चहा/पाण्याची व्यवस्था ही बक्षिस वितरणाच्या दिवशी आयोजकांकडुन करण्यात येईल. येणे जाणे व राहण्याची व्यवस्था ही आयोजकांकडून करण्यात येणार नाही.
१९) सदर स्पर्धेमध्ये सादर केल्या जाणार्या रिल्सवर सामीत्व अधिकार लातूर पोलीस दलाचे राहील तसेच वेळोवेळी जनजागरण करण्यासाठी याचा उपयोग केला जाईल.

लातूर जिल्ह्यातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, जास्तीत जास्त स्पर्धकांनी यात सहभाग घेवुन लोकशक्ती रील्स स्पर्धेत आपले मोलाचे योगदान द्यावे.

धन्यवाद...!

#StopAddiction
#Say No To Digital Arrest
#Latur Police
#Drive Safe Stay Safe
#Women Empowerment